29 JUN 2022 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठात जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे स्वागत कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी ग्रंथभेट देऊन केले. यावेळी शेजारी पी. डी. राऊत, एस. एस. महाजन, पी. एस. पाटील, व्ही. एन. शिंदे, आर. के. कामत आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठाने पंचगंगा संवर्धनाबाबत पुढाकार घ्यावा

## राजेंद्रसिंह राणा : कुलगुरूंसमवेत केली चर्चा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने जलसमृद्ध होण्याच्या दिशेने केलेले प्रयत्न कौतुकास्पद असून यापुढील काळात जलसंवर्धनाच्या अनुषंगाने स्थानिक पातळीवर जनजागृती मोहीम हाती घ्यावी. पंचगंगा नदीचे संवर्धन व संरक्षण या दृष्टीने सार्वजनिक पातळीवर जनजागृती करण्याच्या कामी पुढाकार घ्यावा, असे आवाहन ज्येष्ठ जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी सोमवारी येथे केले.

डॉ. राणा यांनी विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. त्यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के यांच्यासह मान्यवरांसमवेत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. सन २००४-०५ मध्ये मी सर्वप्रथम शिवाजी विद्यापीठास भेट दिली असताना पाण्याच्या बाबतीत ते चिंतेत होते. त्यावेळी विद्यापीठास केलेल्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करून जलसमृद्ध आणि पाण्याच्या बाबतीत स्वावलंबी बनलेले विद्यापीठ पाहताना अतिशय आनंद वाटला, असे डॉ. राणा यांनी सांगितले. विद्यापीठाच्या जलसंवर्धनाचा लाभ जल स्वयंपूर्णतेसाठी तर झालाच; पण, त्याचबरोबर गेल्या दोन-तीन वर्षात कोल्हापूर शहराला महापूर काळात पिण्याच्या पाण्याचा अखंड पुरवठा विद्यापीठामार्फत करता आला. विद्यापीठाने आता परिसरातील हिरवाई वाढविण्याच्या दृष्टीनेही वृक्षारोपण, मियावाकी जंगल वृद्धी असे उपक्रमही हाती घेतल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे , प्र-कुलगुरू डॉ. पी. एस.पाटील, अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, एस. एस. महाजन, पी. डी. राऊत, आसावरी जाधव, सचिन पन्हाळकर, उदय गायकवाड आदी उपस्थित होते.

### 'नदी की पाठशाला' उपक्रम हाती घ्यावा

नदी हाच सर्व प्रकारच्या संस्कृतींचा उगम आणि प्रवाह आहे. या प्रवाहाशी तरुण पिढीला जोडण्यासाठी आता प्रयत्न करायला हवेत. त्या दृष्टीने नदी आणि पाणी सवंर्धनाच्या अनुषंगाने 'नदी की पाठशाला' सारखा उपक्रम विद्यापीठाने हाती घ्यावा. जलसंवर्धनविषयक अभ्यासक्रमांची सुरुवात करता येऊ शकेल, असे डॉ. राणा यांनी सांगितले.

2 9 JUN 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे जलसंवर्धनाचे प्रयत्न कौतुकास्पद : राणा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाने जलसमृद्ध होण्याच्या दिशेने केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. पुढील काळात जलसंवर्धनाच्या अनुषंगाने स्थानिक पातळीवर जनजागृती मोहीम हाती घ्यावी, असे आवाहन ज्येष्ठ जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी केले. डॉ. राणा यांनी शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. त्यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह मान्यवरांसमवेत झालेल्या बैठकीत ते बोलत होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ भेटीप्रसंगी जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांना ग्रंथ भेट देतेवेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**

डॉ. राणा म्हणाले, सन २००४-०५ मध्ये मी सर्वप्रथम शिवाजी विद्यापीठास भेट दिली. तेव्हा विद्यापीठ पाण्याच्या बाबतीत चिंतेत होते. त्यावेळी विद्यापीठास केलेल्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करून जलसमृद्ध आणि पाण्याच्या बाबतीत स्वावलंबी बनलेले. हे पाहताना आनंद वाटला.

याप्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या जलसंवर्धनाच्या अनुषंगाने सादरीकरण केले. बैठकीस प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. आसावरी जाधव, डॉ. सचिन पन्हाळकर, उदय गायकवाड आदी उपस्थित होते.

पुढारी



# 'चेतना'तर्फे अरुंधती खाडीलकर यांचा गौरव

कोल्हापूर : चेतना अपंगमती विकास संस्थेच्या वतीने हेलन केलर जयंतीनिमित्त पुणे येथील चिकित्सा मानसशास्त्रज्ञ अरुंधती खाडीलकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते मानपत्र देऊन त्यांना गौरविण्यात आले. यावेळी संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष पवन खेबूडकर, उपाध्यक्ष डॉ. सुनील पाटील, सचिव दिलीप बापट, सौ. अजया पाटील, कृष्णात चौगले, प्रतीक्षा कराळे आदींसह विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कुलगुरूंनी शिवाजी विद्यापीठ व चेतना मंदिरच्या माध्यमातून भविष्यात आदर्श काम उभे करण्याची ग्वाही दिली.

पुढारी



कोल्हापूर : पुण्यातील गरवारे कॉमर्स कॉलेजच्या सदस्यांनी मंगळवारी शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट देऊन विविध विभागांची माहिती घेतली.

# विद्यापीठाचे शैक्षणिक उपक्रम गुणवत्तापूर्ण : प्राचार्य उमराणी

## गरवारे कॉमर्स कॉलेजची विद्यापीठास भेट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय व शैक्षणिक उपक्रम हे नेहमीच गुणवत्तापूर्ण असतात. भविष्यात महाविद्यालय व विद्यापीठ यांच्यामधील समन्वय अधिक दृढ होईल. विद्यार्थ्यांना अधिकाधिक गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शैक्षणिक उपक्रमांची देवाण-घेवाण करण्याच्या दृष्टीने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल असेल, असा विश्वास पुणे येथील गरवारे कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी प्र. कुलगुरू, प्रा. डॉ. एन. एस. उमराणी यांनी व्यक्त केला.

पुणे येथील गरवारे कॉमर्स कॉलेजच्या समितीने मंगळवारी शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. प्रारंभी वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी स्वागत केले. प्रास्ताविक डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी केले. सर्व सदस्यांनी शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांची भेट घेऊन शिवाजी विद्यापीठाच्या प्रशासकीय व शैक्षणिक बाबींवर चर्चा केली. डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी आभार मानले.

29 JUN 2022          तरुण भारत          जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गरवारे कॉमर्स कॉलेजची शिवाजी विद्यापीठाला भेट

प्रतिनिधी
कोल्हापूर

पुणे येथील गरवारे कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी प्र. कुलगुरु डॉ. एन. एस. उमराणी यांनी शिवाजी विद्यापीठाला भेट दिली. विद्यापीठातील अध्यापन, प्रशासकीय कामकाज आणि नॅक मूल्यांकनाचे कामकाज पाहून समाधान व्यक्त केले.

त्यांचे स्वागत वाणिज्य व व्यवस्थापन विभागप्रमुख प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी केले. डॉ. गुरव यांनी वाणिज्य व व्यवस्थापन विभागाची माहिती दिली. डॉ. उमराणी म्हणाले, शिवाजी विद्यापीठातील प्रशासकीय व शैक्षणिक उपक्रम नेहमीच गुणवत्तापूर्ण असतात. विद्यापीठातील चांगल्या बाबींची देवाणघेवाण होण्यासाठी ही भेट नक्कीच उपयुक्त ठरेल. भविष्यात महाविद्यालय व विद्यापीठ यांच्यामधील समन्वय अधिक दृढ होईल. विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण शिक्षणासाठी शैक्षणिक उपक्रमांची देवाणघेवाणीच्या दृष्टीने टाकलेले हे महत्वाचे पाऊल असेल.



**कोल्हापूर : पुणे गरवारे कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. एन. एस. उमराणी यांचे स्वागत करताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. ए. एम. गुरव, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. के. व्ही. मारूलकर आदी.**

प्र–कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांची भेट घेऊन विद्यापीठाच्या प्रशासकीय व शैक्षणिक बाबींवर चर्चा केली. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी नॅक मूल्यांकन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. सांख्यिकी अधिकारी अभिजीत रेडेकर यांनी मार्गदर्शन केले. डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी आभार मानले.

2 9 JUN 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारतीय संख्याशास्त्राचे योगदान

**भारतीय स्वातंत्र्याची पंचाहत्तरी साजरी करीत असताना विविध क्षेत्रांमधील आपल्या प्रगतीचा धांडोळा घेणे क्रमप्राप्त आहे. याला संख्याशास्त्राचे क्षेत्र अपवाद असण्याचे कारण नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात सांख्यिकी रचनेमध्ये ब्रिटीश सरकारचा प्रभाव होता. भारताची संपूर्ण माहिती संकलित करण्याचा प्रयत्न सन १८६७ ते १८७२ या कालावधीत झाला, परंतु तो परिपूर्ण असा नव्हता. सन १८७२मध्ये सुरू झालेली जनगणना दर दहा वर्षांनी आपल्या देशात आजतागायत सुरू आहे. २०११ पर्यंत १५ वेळा जनगणना करण्यात आली असून २०२१ची सोळावी जनगणना कोविड-१९च्या प्रादुर्भावामुळे पुढे ढकलण्यात आली आहे.**


प्रा. महालनोबीस


प्रा. सी. आर. राव


प्रा. वसंत हुजूरबाजार

देशाला विसाव्या शतकाच्या प्रारंभीपासून सामाजिक-आर्थिक विकासासाठी सांख्यिकी रचनाप्रणाली आवश्यक भासू लागली. प्रा. प्रशांत महालनोबीस यांनी भारतामध्ये आर्थिक विकासामध्ये 'संख्याशास्त्र' हे प्रमुख तंत्रज्ञान म्हणून वापरावयास चालना दिली. प्रा. महालनोबीस हे भौतिकशास्त्रातले पदवीधर असूनही आपल्या देशाच्या प्रगतीसाठी सांख्यिकी म्हणजेच संख्याशास्त्र वापरासाठी योगदान दिले. त्यांच्या या योगदानाची दखल म्हणूनच २९ जून ही त्यांची जयंती भारत सरकारने सन २००७ पासून राष्ट्रीय सांख्यिकी दिन म्हणून साजरा करण्यास सुरवात केली. सन १९३१ मध्ये देशात भारतीय सांख्यिकी संस्थेच्या स्थापनेपासून ते विविध क्षेत्रांत संख्याशास्त्राचा वापर प्रभावीपणे करण्याच्या संदर्भात प्रा. महालनोबीस यांचे कार्य एकमेवाद्वितिय स्वरुपाचे आहे. प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये प्राध्यापक असताना देशातील पहिली संख्याशास्त्राची प्रयोगशाळा त्यांनी सुस्थापित केली आणि त्यानंतर संख्याशास्त्राशी निगडित अनेक संकल्पना त्यांनी राबविल्या. राष्ट्रीय विकासामध्ये संख्याशास्त्राचे महत्त्व त्यांनी पटवून दिले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये महत्त्वाचे योगदान दिले.

प्रा. महालनोबीस यांच्याच मुशीतून अनेक संख्याशास्त्रज्ञ भारतात घडले. त्यात प्रामुख्याने प्रा. सी.आर. राव यांचे नाव अग्रक्रमाने घ्यायला हवे. त्यांनी भारतीय सांख्यिकी संस्थेत नोकरी व संशोधन केल्यानंतर केंब्रिज विद्यापीठातून अँथ्रॉपॉलॉजी स्टडीज या विषयात पीएच.डी. प्राप्त केली. प्रा. राव यांनी विविध प्रश्नांची उकल करण्यासाठी आवश्यक संख्याशास्त्रीय पद्धती विकसित केल्या. रसायनशास्त्रज्ञाला रसायनशास्त्राचे प्रश्न असतात, वनस्पतीशास्त्रातील संशोधकाला वनस्पतींशी निगडीत प्रश्न असतात, पदार्थ विज्ञानामधील संशोधकांना त्यांच्या विषयाचे प्रश्न असतात. परंतु संख्याशास्त्र विषयाच्या संशोधकाला संख्याशास्त्राचे प्रश्न नसतात. त्यांनी इतरांचे प्रश्न सोडविण्यासाठी संख्याशास्त्राचा वापर करणे अपेक्षित असते. हा त्यांचा संख्याशास्त्राकडे पाहण्याचा व्यापक दृष्टीकोन आहे. त्यातूनच त्यांचे बहुआयामी संशोधन साकारले. प्रा. राव यांचा शंभरावा वाढदिवस १० सप्टेंबर २०२० रोजी जगभरात साजरा झाला. येत्या सप्टेंबरमध्ये ते वयाची १०२ वर्षे पूर्ण करतील. म्हणूनच जग 'लिव्हींग लिजंड' म्हणून त्यांचा गौरव करते.


डॉ. डी. टी. शिर्के

सातारा जिल्ह्यातील बुध येथे जन्मलेले महाराष्ट्राचे सुपुत्र व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संख्याशास्त्रज्ञ प्रा. पांडुरंग वासुदेव सुखात्मे यांनीही समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी सांख्यिकी पद्धतीचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला. त्यांनी लंडन विद्यापीठातून पीएच.डी.ची पदवी घेतली. तेथे त्यांनी सॅम्पलिंग सिद्धांताविषयी मूलभूत स्वरुपाचे संशोधन केले, जे पुढे शेतीतील सुधारणा व विकास कार्यक्रमासाठी अत्यंत उपयुक्त ठरले. लंडनहून परतल्यानंतर सुखात्मे यांनी आपले संपूर्ण आयुष्य या देशातील गोरगरीब जनतेचे प्रश्न आपल्या सांख्यिकीय ज्ञानाच्या माध्यमातून सोडविण्यासाठी वेचले. जागतिक आरोग्य संघटनेचा कुपोषणविषयक टक्केवारीचा निष्कर्ष चुकीचा ठरवित जगातील वीस टक्के लोक उपासमारीने त्रस्त आहेत, असा धक्कादायक निष्कर्ष त्यांनी जगासमोर ठेवला. त्यांच्या या कामगिरीची दखल घेत त्यांना रॉयल स्टॅटिस्टिकल सोसायटीने 'गाय मेडल' प्रदान करून सन्मानित केले. प्रा. सुखात्मे यांच्या योगदानाप्रती कृतज्ञता म्हणून सन २०११ या त्यांच्या जन्मशताब्दी वर्षापासून शिवाजी विद्यापीठातर्फे पदव्युत्तर संख्याशास्त्र विभागात सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या विद्यार्थ्यास दिक्षान्त समारंभात पारितोषिक देऊन गौरविण्यात येते.

आणखी एक महत्त्वाचे संख्याशास्त्रज्ञ कोल्हापूरचे प्रा. वसंत शंकर हुजूरबाजार. बनारस हिंदु विश्वविद्यालयातून त्यांनी गणितात एम. एस्सी. केली. त्यावेळी त्यांनी रोलेच्या प्रमेयावर एक शोधनिबंध लिहीला. त्यांना प्रा. महालनोबीस यांचे व्याख्यान ऐकण्याची आणि प्रा. सुखात्मे यांना भेटण्याची संधी त्यांना मिळाली. काही काळ राजाराम महाविद्यालयात व्याख्याते म्हणून काम केल्यानंतर ते उच्चशिक्षणासाठी केंब्रिजला गेले. बेईज् संख्याशास्त्रात पीएच.डी. प्राप्त करणारे ते तिथले पहिले विद्यार्थी ठरले. त्यांच्या प्रबंधासाठी त्यांना 'ॲडम्स प्राईझ' देऊन गौरविण्यात आले. गेल्या ७५ वर्षांत देशाने साधलेल्या प्रगतीमध्ये मोलाचा वाटा उचलणारे अनेक संख्याशास्त्रज्ञ आहेत. त्यामध्ये गणेश व्यंकटेश जोशी, डॉ. राजचंद्र बोस, डॉ. विनायक गोविंद पानसे, प्रा. डी. डी. कोसंबी, डॉ.एस. एस. श्रीखंडे, डॉ. के. सी. श्रीधरन पिल्लाई, डॉ. वि. म. दांडेकर, प्रा. देवव्रत लाहिरी, डॉ. गोपीनाथ कल्लईनपुर, डॉ. विद्याधर गोडांबे, डॉ. राधागोविंद लाहा इत्यादी अनेकांचा सहभाग आहे. त्यातील चौघांच्या कार्याची वानगीदाखल नोंद येथे घेतली असली तरी सर्वांनीच आपापल्या परीने योगदान देऊन संख्याशास्त्र समृद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे, हे येथे कृतज्ञतापूर्वक नोंदविणे अगत्याचे आहे. समकालीन तसेच भावी संख्याशास्त्रज्ञांनी हा वारसा जतन करण्याबरोबरच वृद्धिंगत करण्याची जबाबदारी स्वीकारावी, हीच या राष्ट्रीय सांख्यिकी दिनाच्या निमित्ताने अपेक्षा!




**- डॉ. डी. टी. शिर्के, संख्याशास्त्रज्ञ, शिवाजी विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू**

29 JUN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महालनोबीस; भारतीय संख्याशास्त्राचे जनक

**भारतात दरवर्षी २९ जून हा राष्ट्रीय सांख्यिकी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. भारतीय संख्याशास्त्राचे जनक म्हणून ज्यांना ओळखले जाते त्या प्रा. प्रशांतचंद्र महालनोबीस यांचा २९ जून हा जन्मदिवस. यानिमित्त...**

– प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

प्रा. प्रशांतचंद्र महालनोबीस यांनी संख्याशास्त्र हा विषय आणि त्याचा राष्ट्रीय विकासामध्ये वापर या कामी दिलेल्या योगदानाच्या सन्मानार्थ भारत सरकारकडून २००७ पासून त्यांचा जन्मदिवस राष्ट्रीय सांख्यिकी दिन म्हणून साजरा करण्यात येऊ लागला. सर्वसामान्यांना संख्याशास्त्र विषयाबाबत नेहमीच कुतूहल व औत्सुक्य राहिलेले आहे. सरकारी क्षेत्रातील निर्णय प्रक्रियेपासून खासगी उद्योगधंद्यांच्या नफावृद्धीसाठी संख्याशास्त्राचा उपयोग संगणकाच्या मदतीने होत असल्याचे दिसून येते. भारतात या क्षेत्राचा उदयच मुळी प्रा. प्रशांतचंद्र महालनोबीस यांच्यामुळे झाला. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांमध्ये सर्वच क्षेत्रांत संख्या- म्हणजेच 'डाटा' आणि डाटा सायन्स अर्थात विदा विज्ञानाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे.

या विज्ञानशाखेचे राष्ट्रीय जनक असलेल्या प्रा. महालनोबीस यांचा जन्म २९ जून १८९३ रोजी कलकत्ता येथे एका सुसंस्कृत घरात झाला. महालनोबीस हे मुळात भौतिकशास्त्रज्ञ.



प्रा. प्रशांतचंद्र महालनोबीस

कोलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी महाविद्यालयातून १९१२ मध्ये भौतिकशास्त्राची पदवी प्राप्त केली. त्यानंतर केंब्रिज विद्यापीठातून त्यांनी गणित आणि भौतिकशास्त्र या विषयांत एमएची पदवी मिळविली.. परदेशातून परत येत असताना बोटीवर कार्ल पिअर्सन यांच्या 'बायोमेट्रिका' या संख्याशास्त्रावरील सुप्रसिद्ध जर्नलचे अंक त्यांच्या पाहण्यात आले. त्याद्वारे त्यांना संख्याशास्त्राचा

परिचय झाला. कोलकत्त्यात परतल्यानंतर त्यांनी सन १९२२ ते १९४८ या कालावधीत प्रेसिडेन्सी महाविद्यालयात अध्यापन व संशोधनाचे कार्य केले. येथे त्यांनी देशातील पहिली सांख्यिकी प्रयोगशाळा उभारली. भारतीय सांख्यिकी संस्थेच्या (इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट) उभारणीचेही श्रेय प्रा. महालनोबीस यांनाच आहे. ओडिशामधील ब्राह्मणी नदीला महापूर आलेला होता. त्यावेळी ओडिशा सरकारने प्रा. महालनोबीस यांच्याकडे या महापुरावर उपाय सुचविण्याची जबाबदारी सोपविलेली होती. तेव्हा प्रा. महालनोबीस यांनी मागील साठ वर्षांच्या आकडेवारीचा सर्वंकष अभ्यास केला आणि उपाय सुचविला. नदीच्या वरील भागात ठिकठिकाणी धरणे बांधल्यास महापुराचा प्रश्न आटोक्यात येईल, असा निष्कर्ष काढला होता. त्यानुसार मग कार्यवाही करण्यात आली. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांना भारताच्या विकासासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर करण्याची सूचना प्रा. महालनोबीस यांनी केलेली होती. या कारणामुळे या दोघांमध्ये उत्तम मैत्रसंबंध प्रस्थापित झालेले होते. भारताच्या सन्मानाच्या पद्मभूषण या नागरी पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले.

नियोजनाच्या अनुषंगाने प्रा. महालनोबीस यांनी अत्यंत वस्तुनिष्ठ विचार मांडलेले आहेत, जे आजच्या काळातही अनुकरणीय आहेत. योग्य नियोजनाद्वारे रोजगाराचे नवनवे मार्ग निर्माण करायला हवेत आणि त्याद्वारे नागरिकांचे राहणीमान उंचावले पाहिजे, असे त्यांचे मत होते. मोठ्या उद्योगांचा आग्रह धरण्यामागेही त्यांची हीच भावना होती. कृषी संशोधनासाठीही त्यांनी खूप मोठ्या प्रमाणात विदा संकलन केले. कृषीविषयक प्रयोगाची योजना आखणे ही एक अत्यंत जबाबदारीची व महत्त्वाची आर्थिक बाब आहे, असे ते सांगत. देशातील सर्वसामान्यांच्या कल्याणापासून ते राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी संख्याशास्त्राचा अचूक आणि परिणामकारक वापर करण्याचा आदर्श वस्तुपाठ म्हणजे प्रा. महालनोबीस यांचे जीवनकार्य होय.

लोकमत

# सांख्यिकी दिनानिमित्त आज परिसंवाद

कोल्हापूर : राष्ट्रीय सांख्यिकी दिनानिमित्ताने शिवाजी विद्यापीठाने शिववार्ता युट्यूब वाहिनीवर आज, बुधवारी सकाळी अकरा वाजता विशेष ऑनलाईन परिसंवाद आयोजित केला आहे. त्यात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, ज्येष्ठ विचारवंत डॉ. प्रकाश पवार, डॉ. शशिभूषण महाडिक सहभागी होणार आहेत.

पुढारी

# 'शिव वार्ता' यूट्यूब वाहिनीवर आज परिसंवाद

**कोल्हापूर :** राष्ट्रीय सांख्यिकी दिनानिमित्ताने बुधवारी (दि. २९) शिवाजी विद्यापीठाच्या 'शिव वार्ता' यूट्यूब वाहिनीवर एका विशेष ऑनलाईन परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, ज्येष्ठ विचारवंत डॉ. प्रकाश पवार आणि डॉ. शशिभूषण महाडिक हे या परिसंवादात सहभागी होणार आहेत. बुधवारी सकाळी ११ वाजता हा परिसंवाद यूट्यूबवर पाहता येईल.

पुढारी

# विद्यापीठाचा विद्यार्थी ज्ञानाचा भांडार असावा : जॉर्ज क्रुझ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठाचा विद्यार्थी ज्ञानाचा भांडार असला पाहिजे, असे प्रतिपादन जॉर्ज क्रुझ यांनी केले. शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र अधिविभागाच्या वतीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त 'व्यक्तिमत्त्व आणि कौशल्य विकास' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे यांनी आपल्या आयुष्यात ज्ञानसाठा किती महत्त्वाचा आहे, याचे विवेचन केले. कोमल ओसवाल यांनी सूत्रसंचालन केले. अभिजित पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रतिमा पवार यांनी आभार मानले. यावेळी डॉ. प्रतिभा देसाई, आकाश ब्राह्मणे, आदी उपस्थित होते.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज फिल्म मेकिंग कार्यशाळा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने 'फिल्म मेकिंग' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. मानव्य विद्या सभागृहात बुधवारी सकाळी ११ वाजता कार्यशाळेचे उद्घाटन अक्कमादेवी महिला विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख प्रा. डॉ. ओंकार काकडे यांच्या हस्ते होणार आहे.

याप्रसंगी लघुपटांना राष्ट्रीय स्तरावर पारितोषिक प्राप्त झालेल्या विभागातील विद्यार्थ्यांचा सन्मान प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे, कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी चित्रपट समीक्षक अनमोल कोठाडिया 'चित्रपट निर्मिती प्रक्रिया आणि समीक्षा' या विषयावर आणि चित्रपट निर्माते, चित्रपट लेखक आणि दिग्दर्शक अनुप जत्राटकर 'चित्रपट निर्मिती' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशीच्या संगीत संयोजक ऐश्वर्य मालगावे 'चित्रपटनिर्मितीमध्ये संगीताची निवड' या विषयावर आणि व्हिडीओ एडिटर जगदीश गुरव व्हिडीओ एडिटिंगविषयी मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेमध्ये सहभागी होण्यासाठी https://docs.google.com/forms/d/e/1 या लिंकवर नोंदणी करण्याचे आवाहन पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या प्रमुख आणि कार्यशाळेच्या संयोजक प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात आज फिल्ममेकिंग कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने 'फिल्ममेकिंग' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. विद्यापीठातील मानव्यविद्या सभागृहात दि. २९ रोजी सकाळी ११ वाजता या कार्यशाळेचे उद्‌घाटन अक्कमहादेवी महिला विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख प्रा. डॉ. ओंकार काकडे यांच्या हस्ते होणार आहे.

याप्रसंगी लघुपटांना राष्ट्रीय स्तरावर पारितोषिक मिळवलेल्या रोहित कांबळे, सोमदत्त देसाई, मल्हार जोशी आणि आकाश बोकमूरकर यांचा सत्कार करण्यात येणार आहे. कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी चित्रपट समीक्षक अनमोल कोठाडिया लेखक आणि दिग्दर्शक अनुप जत्राटकर, तर दुसऱ्या दिवशीच्या संगीत संयोजक ऐश्वर्य मालगावे, व्हिडीओ एडिटर जगदीश गुरव मार्गदर्शन करणार आहेत. विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या प्रमुख आणि कार्यशाळेच्या संयोजक प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

सकाळ

# चित्रपटनिर्मितीवर आजपासून कार्यशाळा

## मास कम्युनिकेशन विभागातर्फे आयोजन

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठात, मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने 'फिल्म मेकिंग' विषयावर उद्या (ता. २९) पासून दोनदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. विद्यापीठाच्या मानव्यविद्या सभागृहात उद्या सकाळी ११ वाजता या कार्यशाळेचे उद्घाटन अक्कमादेवी महिला विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख प्रा. डॉ. ओंकार काकडे यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी लघुपटांना राष्ट्रीयस्तरावर पारितोषिक प्राप्त झालेल्या विभागातील विद्यार्थ्यांचा सन्मान प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. जर्नालिझम विभागाचे रोहित कांबळे यांच्या 'देशी' या शॉर्ट फिल्मला ॲमेझॉन-फिल्मफेअर ॲवॉर्ड मिळालेला आहे. सोमदत्त देसाई यांनी बनवलेल्या 'म. ना.' या लघु चित्रपटाला भारत सरकारच्या 'आजादी का अमृत महोत्सवा'अंतर्गत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत पारितोषिक मिळाले असून, आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव गोवा येथे यानिमित्ताने त्यांना पारितोषिक दिले. त्याचबरोबर भारत सरकारच्या आरोग्य मंत्रालयाच्या वतीने आयोजित, 'अँटी टोबॅको शॉर्ट फिल्म स्पर्धेत' मास कम्युनिकेशन विभागाचे विद्यार्थी मल्हार जोशी आणि आकाश बोकमुरकर यांच्या 'कॅच इट' या शॉर्ट फिल्मसाठी उत्तेजनार्थ राष्ट्रीय पारितोषिक मिळाले आहे.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी चित्रपट समीक्षक अनमोल कोठाडिया 'चित्रपटनिर्मिती प्रक्रिया आणि समीक्षा' या विषयावर आणि चित्रपट निर्माते, चित्रपट लेखक आणि दिग्दर्शक अनुप जत्राटकर 'चित्रपटनिर्मिती' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशीच्या संगीत संयोजक ऐश्वर्य मालगावे 'चित्रपट निर्मितीमध्ये संगीताची निवड' या विषयावर आणि व्हिडिओ एडिटर जगदीश गुरव विद्यार्थ्यांना व्हिडिओ एडिटिंगविषयी मार्गदर्शन करणार आहेत. तरी विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या प्रमुख आणि कार्यशाळेच्या संयोजक प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

29 JUN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आता अर्थशास्त्रातून ‘बी.एस्सी, एम.एस्सी’

## वित्तीय सेवा क्षेत्रात संधी; राज्यात पहिल्यांदाच शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात प्रारंभ

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठात अर्थशास्त्र विभागात ‘बी. एस्सी, एम.एस्सी इकॉनॉमिक्स’ हा पाच वर्षांचा इंटिग्रेटेड अभ्यासक्रम सुरू केला आहे. अर्थशास्त्राचे सर्वांगीण ज्ञान देणारा राज्यातील पहिलाच अभ्यासक्रम आहे, अशी माहिती डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी दिली.

वित्तीय सेवा क्षेत्रात करिअरच्या संधी आहेत. याचा विचार करून हा नवा अभ्यासक्रम बनवला. यामध्ये पाच वर्षांत अर्थशास्त्र आणि तत्सम विषयांशी निगडित सुमारे ६० विषय अभ्यासक्रमात येणार आहेत. मॅथॅमॅटिक्स, स्टॅटिस्टिक, मॅथॅमॅटिकल



इकॉनॉमिक्स, इकॉनॉमेट्रिक्स या विषयांचा अंतर्भाव आहेच. याशिवाय विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर प्रोग्रॅमिंगबाबतही ज्ञान दिले जाणार आहे. इंग्रजी, फ्रेंच व जर्मन या भाषा शिकण्याची सुविधा असून, त्या अनिवार्य आहेत. व्यवस्थापन शास्त्राशी निगडित विषयही असल्याने व्यवस्थापन क्षेत्राशी संबंधित संधीही विद्यार्थ्यांना मिळतील. हा अभ्यासक्रम जरी पाच वर्षांचा असला तरी तीन वर्षे पूर्ण केल्यावर बी.एस्सी. इकॉनॉमिक्स पदवी मिळेल. चार वर्षे पूर्ण केल्यावर इकॉनॉमिक्स ऑनर्स ही पदवी दिली जाईल. पाच वर्षे पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांकडे एम.एस्सी. पदव्युत्तर पदवी असेल. कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी, विद्यार्थिनींना प्रवेश मिळेल. अभियांत्रिकी डिप्लोमा केलेल्यांनाही प्रवेश घेता येणार आहे. प्रवेशासाठी अर्थशास्त्र विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

### करिअरच्या संधी

विद्यार्थ्यांना बँकिंग, फायनान्स, इन्शुरन्स, मॅनेजमेंट या क्षेत्रांत नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. विविध प्रकारच्या औद्योगिक क्षेत्रातही हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्यांना प्राधान्य राहील. युपीएससी आणि एमपीएससी परीक्षेसाठीही हा अभ्यासक्रम उपयुक्त असून, त्या दृष्टिकोनातूनही अभ्यासक्रमाची निर्मिती केली आहे.

> बी.एस्सी, एम.एस्सी इकॉनॉमिक्स हा पथदर्शी अभ्यासक्रम आहे. विस्तारणारे वित्तीय क्षेत्र, संशोधन आणि परदेशातील उपलब्ध संधी याचा विचार करून अभ्यासक्रमाची निर्मिती केली गेली आहे. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबरच, नोकरी व व्यवसायाच्या संधी तसेच कॉर्पोरेट आणि संशोधनाच्या क्षेत्रात काम करण्याचा आत्मविश्वास देईल.
>
> प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

> अर्थशास्त्राचा संबंध सर्वच क्षेत्रांशी येतो. त्यामुळे अर्थशास्त्राचे शिक्षण घेणाऱ्यांना करिअरच्या अनेक संधी असतात. औद्योगिक, वित्तीय, बँकिंग या सर्वच क्षेत्रांतील भविष्यातील संधी लक्षात घेऊन बी.एस्सी., एम.एस्सी इकॉमॉमिक्स हा पाच वर्षांचा इंटिग्रेटेड अभ्यासक्रम तयार केला आहे. अर्थशास्त्राचे मूलभूत ज्ञान, कॉर्पोरेट क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्ये आणि तंत्रज्ञानाचा अवलंब या सर्वच गोष्टींचा समावेश या अभ्यासक्रमात आहे.
>
> – प्रा. डॉ. ज्ञानदेव तळुले

सकाळ

# विद्यापीठाचा विद्यार्थी ज्ञानाचे भांडार असावा : जॉर्ज क्रुझ

कोल्हापूर : विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी चौफेर वाचन केले पाहिजे, हा विद्यार्थी म्हणजे ज्ञानाचे भांडार असले पाहिजे, असे मत स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शक जॉर्ज क्रुझ यांनी व्यक्त केले. समाजशास्त्र विभागात व्यख्यानात ते बोलत होते. अध्यक्षीय मनोगतात प्रा. डॉ. जगन कराडे यांनी आपल्या आयुष्यात ज्ञानसाठा किती महत्त्वाचा आहे, याचे विवेचन केले. प्रास्ताविक अभिजित पाटील यांनी केले. डॉ. प्रतिमा पवार यांनी आभार मानले, तर कोमल ओसवाल यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास डॉ. प्रतिभा देसाई, आकाश ब्राह्मणे यांच्यासह विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

तरुण भारत

# विद्यापीठाचा विद्यार्थी ज्ञानाचे भांडार असावा : प्रा. जॉर्ज क्रुझ

कोल्हापूर : विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकासासाठी गौतम बुध्दांच्या अष्टांग मार्गाचे अवलंबन करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी वाचन कौशल्य विकसित करण्यावर भर द्यावा. विद्यापीठाचा विद्यार्थी ज्ञानाचा भांडार असला पाहिजे, असे प्रतिपादन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक प्रा. जॉर्ज क्रुझ यांनी केले. शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र अधिविभागाच्यावतीने 'व्यक्तिमत्व आणि कौशल्य विकास" यावर प्रा. क्रुझ यांनी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे होते. डॉ. कराडे यांनी मार्गदर्शन केले. अभिजीत पाटील यांनी स्वागत केले. कोमल ओसवाल यांनी सुत्रसंचालन केले. डॉ. प्रतिमा पवार यांनी आभार मानले. यावेळी डॉ. प्रतिभा देसाई, आकाश ब्राम्हणे, विद्यार्थी उपस्थित होते.

तरुण भारत

# विद्यापीठात आज फिल्म मेकिंग विषयावर कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने 'फिल्म मेकिंग' विषयावर बुधवारी (दि. २९) सकाळी ११ वाजता कार्यशाळेचे आयोजन केले आहे. विद्यापीठाच्या मानव्यविद्या सभागृहात या कार्यशाळेचे उद्घाटन अक्कमहादेवी महिला विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख प्रां. डॉ. ओंकार काकडे यांच्या हस्ते होणार आहे.

लघुपटांना राष्ट्रीय स्तरावर पारितोषिक प्राप्त झालेल्या विभागातील विद्यार्थ्यांचा सन्मान केला जाईल. रोहित कांबळे यांच्या 'देशी" या शॉर्ट फिल्मला ॲमेझॉन- फिल्मफेअर अवॉर्ड मिळालेला आहे. सोमदत्त देसाई यांनी बनवलेल्या 'म. ना." या लघु चित्रपटाला भारत सरकारच्या 'आजादी का अमृत महोत्सवा"अंतर्गत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत पारितोषिक मिळाले आहे. त्याबरोबरच भारत सरकारच्या आरोग्य मंत्रालयाच्या वतीने आयोजित, 'ॲंटी टोबॅको शॉर्ट फिल्म स्पर्धेत" मल्हार जोशी आणि आकाश बोकमुरकर यांच्या 'कॅच इट" या शॉर्ट फिल्मसाठी उत्तेजनार्थ राष्ट्रीय पारितोषिक मिळाले आहे. चित्रपट समीक्षक अनमोल कोठाडीया 'चित्रपट निर्मिती प्रक्रिया आणि समीक्षा" या विषयावर आणि चित्रपटनिर्माते, चित्रपट लेखक आणि दिग्दर्शक अनुप जत्राटकर 'चित्रपट निर्मिती", तर संगीत संयोजक ऐश्वर्य मालगावे 'चित्रपट निर्मितीमध्ये संगीताची निवड' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तरी विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या प्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

2 9 JUN 2022
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील जलसंवर्धन कौतुकास्पद

■ जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे गौरवोद्गार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने जलसमृद्ध होण्याच्या दिशेने केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. यापुढील काळात जलसंवर्धनाच्या अनुषंगाने स्थानिक पातळीवर जनजागृती मोहीम हाती घ्यावी, असे आवाहन ज्येष्ठ जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी केले.डॉ. राणा यांनी शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. त्यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह मान्यवरांसमवेत झालेल्या बैठकीस ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाने जलसंवर्धनाच्या अनुषंगाने केलेल्या कामाचे त्यांनी कौतुक केले.

डॉ. राणा म्हणाले, सन २००४-०५ मध्ये मी सर्वप्रथम शिवाजी विद्यापीठास भेट दिली होती, तेंव्हा पाण्याच्या बाबतीत चिंता वाटत होती. त्यावेळी विद्यापीठास केलेल्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करून जलसमृध्द आणि पाण्याच्या बाबतीत स्वावलंबी बनलेले विद्यापीठ पाहताना अतिशय आनंद वाटत आहे. भविष्यात काळात विद्यापीठाने पंचगंगा नदीचे संवर्धन व संरक्षण या दृष्टीने सार्वजनिक पातळीवर जनजागृती करण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. नदी आणि पाणी सवंर्धनाच्या अनुषंगाने नदी की पाठशाला" सारखा उपक्रम विद्यापीठाने हाती घ्यावा.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाच्या जलसंवर्धनाचा लाभ जल स्वयंपूर्णतेसाठी झाला. विद्यापीठाने परिसरातील हिरवाई वाढविण्याच्या दृष्टीनेही वृक्षारोपण, मियावाकी जंगल वृध्दी असे उपक्रमही हाती घेतले आहेत. जैवविविधता समृध्दीसाठी त्यांचा निश्चितपणे लाभ होईल. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी विद्यापीठाच्या जलसंवर्धनाच्या अनुषंगाने सादरीकरण केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. आसावरी जाधव, डॉ. सचिन पन्हाळकर, उदय गायकवाड, प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

Times of India

# SUK to conduct semester exams in offline MCQ format

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has decided to conduct all the semester exams offline and that too in the multiple choice question (MCQ) format.

Several student bodies have been protesting for conducting the exams offline in MCQ format and not the descriptive format.

Varsity's exam and evaluation department director Dr Ajitsinh Jadhav said, "The state government had decided to conduct all the university examinations in the state in offline mode. Accordingly, the SUK had decided to conduct the exams offline in descriptive format. However, students and various organizations agitated against this decision."

He added, "Therefore, the SUK decided to conduct the examinations of law and engineering streams in offline MCQ format. Later, students demanded that all the examinations should be conducted in offline MCQ method following which, we decided to do the same."